पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८६**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २६/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **२६/०८/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य आणि अधिकारी सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य आणि अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.जागडे – प्र.कार्यालयीन अधिक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा.सदस्यांनी सदरची सभा गुरूवार दिनांक २७/०८/२०२० रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(प्र.कार्यालय अधिक्षक)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८६**

(सभावृत्तांत)

( दिनांक २६/०८/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – २७/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२६/०८/२०२० दु.२.३० वा. ची **तहकूब** सभा **गुरूवार दि.२८/०८/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.कदम शशिरांक गणपत
१०. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११. मा.संतोष बबन कांबळे
१२. मा.अभिषेक गोविंद बारणे
१३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.पवार - अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.गट्टुवार – कार्यकारी अभियंता, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.डॉ.रॉय – वैद्यकिय अधिकारी, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.तांबे, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.इंदलकर, मा.जोशी – सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.काळे, मा.पवार, मा.भोसले, मा.पाटील, मा.गलबले, मा.धुमाळ, मा.टकले – कार्यकारी अभियंता, मा.गावडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

ठराव क्रमांक – ७३७६ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २७/०८/२०२० विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३३/२०२०, दि.२३/०७/२०२०

विषय - प्रभाग क्र.२५ ताथवडे येथील जीवननगर कडुन मुंबई-बेंग्लोर कडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे..

सदरचा विषय दसरी दाखल करणेत येत आहे.

**अनुकुल – ०९** **प्रतिकुल -०५**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २७/०८/२०२० विभाग–स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३५/२०२०, दि.२४/०७/२०२०

विषय - प्रभाग क्र.२५ मध्ये आवश्यकतेनुसार रस्ते कॉंक्रीटीकरण करणे..

सदरचा विषय दसरी दाखल करणेत येत आहे.

**अनुकुल – १०** **प्रतिकुल -०५**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७८ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २७/०८/२०२० विभाग – ब क्षेत्रिय, पाणीपुरवठा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षेका/पापु/२/कावि/९७/२०२०, दि.०६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पाणीपुरवठा ग्रॅव्हीटी या विभागातंर्गत असलेल्या जलक्षेत्रांसाठी यापुर्वी परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती करणे अशा स्वरूपाच्या एकुण १७ कामांच्या निविदा प्रसिद्ध करून कामाचे आदेश देणेत आले. सदरच्या सर्व कामांचा आदेश दि.०१/०२/२०१९ रोजी देणेत आला असुन सर्व कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.२९/०२/२०२० पर्यंत होती. तदनंतर परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती करणे अशा स्वरूपांची एकत्रित कामांचे अंदाजपत्रक तयार करणेत आले होते व सदर परिचालन व देखभाल आणि दुरूस्तीच्या कामांच्या निविदा या विभागाकडून ई निविदा सुचना क्रमांक पाणीपुरवठा/मुख्यालय/१२/२१-२०१९-२०, दि.३०/१२/२०१९ रोजी प्रसिद्ध करणेत आलेल्या होत्या. तथापि परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती करणे अशा वेगळ्या निविदा काढणेची मागणी आल्याने सदर निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. तदनंतर पुनश्च: परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती अशा स्वरूपाचे कामांचे वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करून कामांच्या निविदा या विभागाकडून ई निविदा सूचना क्र. पाणीपुरवठा/मुख्यालय/३/५०/२०२०-२१ दि. ०९-०६-२०२० रोजी प्रसिद्ध करणेत आलेल्या होत्या. सदरच्या निविदा रद्द करणेत आल्या आहेत. तदनंतर

परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती अशा एकत्रित स्वरूपांचे कामांचे निविदा काढणेची मागणी आल्याने सदर निविदा पुनश्चः रद्द करणेत आल्या आहेत. परिचालन करणे व देखभाल आणि दुरूस्ती अशा एकत्रित कामांचे अंदाजपत्रक तयार करून फेरनिविदा काढणेबाबत निर्देश दिले आहेत त्यानुसार कामांना तांत्रिक मान्यता घेणे, निविदा प्रसिद्ध करणे इत्यादी बाबींमुळे विलंब होणार आहे त्यामुळे जुन्या ज्या कामांना आदेश देणेत आले आहे ,अशा कामांना वाढीव तरतुद तसेच वाढीव सुधारीत मान्यता घ्यावी लागणार आहे. सदर कामांना यापुर्वी सरसकट दि.२०-०४-२०२० चे कार्यालयीन टिपणी मध्ये दि.३१ जुलै २०२० पर्यंत अथवा कोरोना Lockdown पुर्णपणे उठल्यानंतर नविन कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्यापासून २ महिने यापैकी जी तारीख नंतर येईल तो पर्यंत मुदतवाढ मंजुर झाली आहे. परंतु सद्यस्थितीत पुनश्चः निविदा काढणेकामी परिचालन व देखभाल आणि दुरूस्ती करणे कामासाठी एकत्रित अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, निविदा प्रसिद्ध करणे, ठेकेदाराना आदेश प्राप्त होणे या सर्व बाबींना २ महिने एवढा वेळ लागणार असल्याने चालु एकुण १७ कामांना म्हणजेच ज्या कामांना कामाचा आदेश दिला आहे, अशा सर्व महसूली कामांना पुनश्चःसुधारीत मान्यता तसेच वाढीव र.रू.१,४९,९२,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणपन्नास लाख ब्यान्नव हजार फक्त) साठी अनुषंगाने वाढ-घट प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७९ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २७/०८/२०२० विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३७/२०२०, दि.१०/०८/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/45/02/2019-20 अन्वये प्र.क्र.२१ येथील त्रीलोक स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेकामी मे.अंबिका कन्स्ट्रक्शन कं.नि.र.रू.4,07,82,156/- (अक्षरी र.रु.चार कोटी सात लाख ब्याऐंशी हजार एकशे छप्पन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,05,18,982/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,05,18,982/- पेक्षा 9.99% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 10.40% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.3,64,71,136/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,14,964/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,48,210/- = एकुण र.रु.3,67,34,310/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

**सुचक – मा.अभिषेक बारणे** **अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे**

सदरची सभा बुधवार दि.०२/०९/२०२० दु.२.१५ पर्यंत तहकूब करणेत यावी

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती** – बुधवार दिनांक ०२/०९/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८६**

(सभावृत्तांत)

( दिनांक २६/०८/२०२० दु.२.३० वा. व दि.२७/०८/२०२० दु.२.३० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०२/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२७/०८/२०२० दु.२.३० वा.ची **तहकूब** सभा **बुधवार दि.०२/०९/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

या शिवाय मा.इंदलकर – नगरसचिव, हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.संतोष पाटील – अतिरिक्त आयुक्त(१), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.निकम – सह शहर अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी सदरची सभा बुधवार दिनांक ०९/०९/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(चंद्रकांत इंदलकर)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८६**

(सभावृत्तांत)

**(दि.२६/०८/२०२० दु.२.३० वा. दि.२७/०८/२०२० दु.२.३० व दि.०२/०९/२०२० दु.२.१५ ची तहकूब सभा)**

**दिनांक – ०९/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.०२/०९/२०२० दु.२.१५ वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.०९/०९/२०२०** रोजी दु.**०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चौंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहूल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
८. मा.संतोष बबन कांबळे
९. मा.अभिषेक गोविंद बारणे
१०. मा.फुगे भिमाबाई पोपट
११. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१२. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – प्र.अति.आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.इंदलकर - नगरसचिव, मा.इंगळे – उपआयुक्त, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.गलबले, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा,वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.जोशी, मा.दुरगुडे – सहाय्यक आयुक्त, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.टकले, मा.धुमाळ – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.पोर्णिमा सोनवणे

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, पुण्याचे माजी महापौर दत्ता एकबोटे, महाकाय दुर्बिणीचे जनक श्री.गोविंद स्वरूप, माजी नगरसेवक साहेबराव खरात, माजी नगरसेविका शकुंतला साठे, श्रीम.कमल काटे, श्रीमती रंजना अरूण कस्पटे तसेच कोविडमुळे मृत्युमुखी पडलेल्या शहरातील नागरीक व मनपा कर्मचारी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

ठराव क्रमांक – ७३८० विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक–मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(३) यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/२७०/२०२०, दि.१०/०८/२०२०

मा.अति. आयुक्त(३) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.04-01/2020-2021 अन्वये कोरोना विषाणुचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात विद्युत व्यवस्था करणे व अनुषांगिक कामे करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीक एन्टरप्रायजेस निविदा र.रु.26,57,090/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख सत्तावण्ण हजार नव्वद फक्त) पेक्षा -5.50% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८१ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(३) यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/२६७/२०२०, दि.१०/०८/२०२०

मा.अति. आयुक्त(३) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.04-02/2020-2021 अन्वये ग प्रभागांतर्गत कोरोना विषाणुचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता तात्पुरत्या स्वरुपात विद्युत व्यवस्था करणे व अनुषांगिक कामे करणे मे.कमल इलेक्ट्रीक एन्टरप्रायजेस निविदा र.रु.26,57,090/- (अक्षरी र रु.सव्वीस लाख सत्तावण्ण हजार नव्वद रुपये फक्त) पेक्षा -5.50% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३८२ विषय क्रमांक – ०७
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक–मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३३९/२०२०, दि.१३/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) (क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लॉकडाऊनमुळे राज्यात अडकलेले, मदत छावण्या व इतर ठिकाणी आश्रय घेतलेले स्थलांतरीत कामगारांसह बेघर व्यक्ति व इतर यांना निवारा केंद्रामध्ये गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी र.रु.225/- प्रति दिन प्रति व्यक्ति (अक्षरी र.रु.दोनशे पंचवीस फक्त) याप्रमाणे दि.04/05/2020 ते दि.02/06/2020 अखेर झालेल्या र.रु.7,84,575/- (अक्षरी र.रु.सात लाख चौ-याऐंशी हजार पाचशे पंच्याहत्तर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८३ विषय क्रमांक – ०८
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्य.सा.भां., वैद्य.
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक–मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४८४/२०२०, दि.१४/०८/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७०२३, दिनांक ०८/०५/२०२० नुसार नवीन भोसरी रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी(मोशी कोव्हीड सेंटर व नविन जिजामाता रुग्णालय आयसोलेशन कक्ष) दैनंदिन साफसफाईच्या कामकाजाकरीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ ४५ कर्मचारी व ४ सुपरवायझर उपलब्ध करुन देणेकामी दिलेल्या आदेशाची मुदत संपुष्टात आलेने किमान वेतन दरानुसारच सध्याचा कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पुढील सहा महिने कालावधीसाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून किमान वेतन कायदयानुसार र.रु.१२,८८,६१४/- प्रति महा प्रमाणे(सर्व खर्चासहीत) येणा-या र.रु.७७,३१,६८४/- (अक्षरी र.रू.सत्याहत्तर लाख एकतीस हजार सहाशे चौ-याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८४ विषय क्रमांक – ०९
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक–मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/२८२/२०२०, दि.१४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोना विषाणूचा सर्वत्र फैलाव झाला असल्याने तातडीने या आजारावर प्रतिबंध उपाययोजना करणेसाठी बालनगरी व ऑटो क्लस्टर येथील

आयसीयू व O2 बेड करीता आवश्यक साहित्य खरेदी करुन देणेकामी आरोग्य विभागाने दि.01/08/2020 व अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय, यांचेकडील दिनांक 30/7/2020 रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे. आरोग्य विभागाच्या मागणीनुसार वैदयकिय विभागाकडील अल्प मुदतीची जाहिर सुचना क्र.01/2019-20 दि.22/03/2020 मधील प्राप्त लघुत्तम मंजुर दरपत्रकधारक मे.प्राईम सर्जिकल अँन्ड फार्मा यांचेकडून सिरींज पम्प, पोर्टेबल ई.सी.जी. मशिन व मल्टीपॅरा मॉनिटर थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.2,37,18,200/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सदोतीस लाख अठरा हजार दोनशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८५ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – बी.आर.टी.एस.

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.बी.आर.टी.एस.विभाग/३५०/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील भक्ती-शक्ती चौक ते मोशी पर्यंतचा ७५.०० मी. रुंदीचा स्पाईन रस्ता विकास प्राधिकरणामार्फत अंशतः विकसित करणेत आलेला आहे. सदर स्पाईन रस्त्यावरील त्रिवेणीनगर, तळवडे येथील रस्त्याने बाधित मिळकधारकांनी अद्यापही रस्त्याचा ताबा नवनगर विकास प्राधिकरणाकडे न दिल्यामुळे सद्यस्थितीत या ठिकाणी उर्वरित लांबीचा रस्ता विकसित करणेचे काम करता आलेले नाही. येथील रहिवाश्यांचें/ मिळकतधारकांचे पुनर्वसन करणेकामी नवनगर विकास प्राधिकरणामार्फत से.क्र.११, मोशी, येथील भूखंड मनपाकडे हस्तांतरित करणेत आलेला आहे. तसेच सदर भूखंडामधील ले-आऊट देखील मंजूर करणेत आलेला आहे. सदर भूखंडामधील रहिवाश्यांसाठी पायाभूत सुविधा पिंपरी चिंचवड मनपा मार्फत विकसित करावयाचे आहेत. त्यानुषंगाने इकडील संबंधित विभागामार्फत सदर भूखंडाचे सर्वेक्षण करून पायाभूत सुविधा विकसित करणेकामी रस्ते, पाणीपुरवठा, जलनी:सारण, विद्युत व सी.डी. वर्क बाबतच्या आवश्यक बाबींचा अंतर्भाव लक्ष्यात घेऊन त्यादृष्टीने नियोजन करणेकामी तांत्रिक दृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकना प्रमाणे नियोजन करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे, निविदा संच तयार करणे व कामावर दैनंदिन देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता बी.आर.टी.एस. विभागामार्फत मनपा संकेतस्थळावर जाहिर कोटेशन प्रसिध्द करून विषयांकित कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत दि.१५/०२/२०२० ते दि.२१/०२/२०२० या कालावधीमध्ये दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा १.९९% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | सल्लागारांचे नाव | एकूण प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस | १.९९ % | |
| २. | मे.एनव्हायरेसिफ कन्सल्टंट | २.०० % | |
| ३. | मे.एक्सलटेक कन्सल्टंन्सी अँण्ड प्रोजेक्ट प्रा.लि. | २.०० % | |

त्यानुषंगाने सदर कामासाठी मे.ॲश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही कमी दराने (१.९९%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.९९% (०.५०% निविदापूर्व + १.४९% निविदा पश्चात) यादराने मे.ॲश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यास फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८६ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – बी.आर.टी.एस.

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.बी.आर.टी.एस.विभाग/३५१/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दी मध्ये भक्ती शक्ती उद्यान हे प्रेक्षणीय स्थळ असून सदर ठिकाणी नागरिकांची व पर्यटकांची खूप वर्दळ असते. तसेच या ठिकाणी वाहतुकीसाठी भक्ती शक्ती चौकामध्ये उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. भक्ती शक्ती उद्यानाच्या अस्तित्वातील सीमाभिंत काही ठिकाणी पडलेली आहे. सदर ठिकाणी उद्यानाच्या सुरक्षतेसाठी नवीन सीमाभिंत बांधणे आवश्यक आहे. म्हणून सदर पर्यटन स्थळाची शोभा वाढवुन जास्त पर्यटक आकर्षित होतील अश्या प्रकारचे शुशोभिकरण व मजबूत सीमाभिंत बांधणेबाबत मा.महापौर व नगरसदस्य यांनी मागणी केली होती. त्यानुसार आवश्यक सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकना प्रमाणे नियोजन करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे, निविदा संच तयार करणे व कामावर दैनंदिन देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता बी.आर.टी.एस. विभागामार्फत मनपा संकेतस्थळावर जाहिर कोटेशन प्रसिध्द करून विषयांकित कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीबाबत दि.१५/०२/२०२० ते दि.२१/०२/२०२० या कालावधीमध्ये दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.अँश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा १.९८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | सल्लागारांचे नाव | एकूण प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. ॲश्युअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस | १.९८ % | |
| २. | मे.एनव्हायरेसिफ कन्सल्टंट | २.०० % | |
| ३. | मे.एक्सलटेक कन्सल्टंन्सी अँण्ड प्रोजेक्ट प्रा.लि. | २.०० % | |

त्यानुषंगाने सदर कामासाठी मे.ॲश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही कमी दराने (१.९८%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.९८% (०.५०% निविदापूर्व + १.४८% निविदा पश्चात) या दराने मे.ॲश्युअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यास फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८७ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – नागरी सुविधा केंद्र
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक–मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नासुके/२/कावि/१५१/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना त्यांचे नजीकचे ठिकाणी महानगरपालिका तसेच विविध विभागांकडील सेवा सुविधा एकाच ठिकाणी व विहित कालावधीत उपलब्ध होण्यासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड हद्दिमध्ये प्रभाग निहाय १ ते ४ टप्प्यामध्ये एकूण ५६ ठिकाणी नागरिकांकडून सेवा शूल्क आकारून खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित केलेली आहे. महानगरपालिकेने सदर नागरी सुविधा केंद्रचालकांसोबत ३ वर्षाकरिता करारनामा करून करारनामा अटी शर्तीनुसार केंद्रचालकांनी र.रू.५०,०००/- अनामत ठेवी म्हणून महापालिकेस जमा केलेली आहेत. कोविड-१९ चे पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमुळे सदर केंद्रचालकांना दुकान भाडे, लाईटबिल, इंटरनेट बिल व इतर सुविधांचे भाडे देण्याबाबत अडचण व नुकसान झालेने खाजगी तत्वावरील नागरी सुविधा केंद्र चालकांना त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जमा केलेली अनामत र.रु.५०,०००/- मधून ५०% अनामत म्हणजेच र.रू.२५,०००/- प्रती केंद्रचालकांना अदा करणेस व त्या बदलानुसार केंद्र चालकांसोबत केलेल्या करारनामामधील अट क्र.५(५.१.१) Performance Security या मधील अनामत र.रु.५०,०००/-ऐवजी र.रू.२५,०००/-असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८८ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग– माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक–मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/४/कावि/४६०/२०२०, दि.३१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने निगडी येथे साहित्य रत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व वेबीनार द्वारे दि.०१/०८/२०२० ते ०५/०८/२०२० या कालावधीत आयोजित करणेत आले आहे. या अतंर्गत आयोजित कार्यक्रमामधील व्याख्याते व कलाकारांचे मानधन, बक्षिसे, फ्लेक्स बॅनर, चहापान नाष्टा व भोजन व्यवस्था इ. करीता थेट पद्धतीने अंदाजे र.रु.९,०५,०००/-(अक्षरी र.रु.नऊ लाख पाच हजार फक्त) इतका खर्च अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.९,०५,०००/-(अक्षरी र.रू.नऊ लाख पाच हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८९ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०५/कावि/७७५/२०२०, दि.१७/०८/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या विविध विभागांना आवश्यक कॅनॉन कंपनीचे विविध टोनर्स खरेदी करणेकामी केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवरील प्रसिध्द केलेली निविदा GeM Bid No.GEM/2019/B/ 352655 अन्वये मे.प्रियाटेक सोल्युशन्स (पुणे) प्रा.लि., पुणे यांनी दर कमी करुन फेरसादर केलेली निविदा लघुत्तम प्राप्त झालेली असुन स्विकृत करण्यात आलेली आहे. तथापि, मनपाचे विविध विभागांद्वारे, रुग्णालयाद्वारे, उभारण्यात आलेले व उभारण्यात येणारे कोविड केअर सेंटर्स यांचेकडून दैनंदिन वापराकामी कॅनॉन कंपनीच्या ३३७ व ३२८ नंबरच्या टोनर्सची सातत्याने मागणी होत असुन संबंधित मागणी पूर्तता होणे आवश्यक संबंधित टोनर्सची निकड लक्षात घेता कॅनॉन कंपनीच्या प्रिंटर्ससाठी ३३७ नंबरचे २५० नग व ३२८ नंबरचे ७५ नग टॉनर्स हे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ च्या परिशिष्ठ ३.३.२ मधील तरतूदीनुसार मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि., पुणे यांचेकडून पूर्वीच्याच मंजुर दराने एकूण र.रु.१२,९५,५००/-चे खरेदी करणेकामी करारनामा करुन पुरवठाआदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९० विषय क्रमांक – १५
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक–मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.वैद्यकिय संचालक यांचे पत्र क्र.वैद्य/०९/कावि/४११४/२०२०, दि.१२/०८/२०२०

मा.वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासन आदेशानुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम १९ जानेवारी २०२० रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'एन.यु.एच.एम.' या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.२,३१,०००/- आगाऊ काढणेत आलेले असून यामधून प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.२,२८,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख अठ्ठावीस हजार फक्त) खर्च करणेत आलेले आहेत त्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९१ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – नगरसचिव
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/१/कावि/७९१/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९२ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग– मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/२७२/२०२०, दि.१८/०८/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९३ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक–मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/२९२/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या नवीन भोसरी, नवीन जिजामाता रुग्णालय व वायसीएम रुग्णालयाकरिता जंबो सिलेंडर ची आवश्यकता आहे. वायसीएम रुग्णालयात अतिरिक्त आयसीयु तयार केले आहे. तसेच नवीन भोसरी, नवीन जिजामाता रुग्णालय आयसीयु चालु करावयाचे आहे. तरी नवीन भोसरी, नवीन जिजामाता रुग्णालय व वायसीएम रुग्णालयाकरिता जंबो सिलेंडर (Medical oxygen jumbo cylinder) अति.आरोग्य वैदयकिय यांचेकडील दिनांक 11/8/2020 रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे. वैदयकिय विभागाकडील मागणी नुसार M/s. GVS Air service India Pvt. Ltd, Barmati यांचेकडील दिनांक १२/०८/२०२० रोजीचे दरपत्रकामधील प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार जंबो सिलेंडर (Medical oxygen jumbo cylinder) 500 नग थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.77,40,000/- (अक्षरी र.रु.सत्याहत्तर लाख चाळीस हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९४ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – जेएनएनयुआरएम

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/११९/२०२०, दि.०४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान (JNNURM), अमृत अभियान, स्वच्छ भारत अभियान, तसेच केंद्र शासन पुरस्कृत विविध योजनांचे अनुषंगाने Project Monitoring & Reform Implementation Support (PMRIS) चे कामकाज करणेकामी मे.KPMG Advisory Services Pvt. Ltd. या संस्थेला दि.२३/०७/२०२० पासुन पुढील ३ महिने कालावधीकरीता किंवा निविदा प्रक्रीया पुर्ण होऊन नव्याने नेमणूक होणा-या संस्थेस कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेसाठी व करारनामा अटी व शर्तीनुसार २ On Site Staff करीता दरमहा र.रु.५,००,१६६/- (अक्षरी र.रु.पाच

लाख एकशे सहासष्ट फक्त) करांव्यतिरीक्त खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९५ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग–स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक–मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१४२/२०२०, दि.१७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/81/02/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील सुर्यनगरी व इतर परिसरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.आर.एम.के इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. नि.र.रू.6,63,04,252/- (अक्षरी र.रु.सहा कोटी त्रेसष्ट लाख चार हजार दोनशे बावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,56,26,559/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.6,56,26,559/- पेक्षा 22.99% कमी म्हणजेच र.रु.5,05,39,013/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,73,043/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,04,650/- = एकुण र.रु.5,12,16,706/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**अनुकुल – ११** **प्रतिकुल -००**

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
**स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/८५९/२०२०
दिनांक – ११/०९/२०२०

**(चंद्रकांत इंदलकर)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.